आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन
निशाणी २४

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव –नामदेव पुनाजी लांडे, वय – ५६ वर्षे,
व्यवसाय – सेवानिवृत्त, राहणार – गुरवझाप,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. माझे नवलेवाडी फाटा येथे श्रेया रेसीडेन्सीमध्ये दोन फ्लॅट आहेत. मी तेथे राहतो. सदर फ्लॅट मी जनार्धन कमलाकर नवले याचेकडून खरेदी केले आहेत. घटना ६ वर्षापुर्वी २२ तारखेला सकाळी ०९:३० वाजता आमच्या फ्लॅटमध्ये घडली होती. त्या दिवशी सकाळी ०९:३० वाजता टाकीत पाणी पडत नव्हते, त्यामुळे आरोपीस त्याबाबत विचारले. त्यावर तो म्हणाला की, तुम्हाला काय करायचे ते करा, पाणी येणार नाही. त्यानंतर तो घरामध्ये आला. त्याने मला मारले व माझा एक दात पाडला. त्यावेळी माझी पत्नी घरामध्ये होती. त्यावेळी त्याने मला शिवीगाळ केली. तसेच आरोपीने माझ्या पत्नीस धक्काबुक्की केली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला आलो. पोलीसांनी मला घोडके डॉक्टरकडे पाठवले. मी तेथे २ दिवस ॲडमीट होतो. त्यानंतर मी भांडकोळी डॉक्टरकडे गेलो. सदर घटनेबाबत माझ्या पत्नीने फिर्याद दिली. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी जनार्धन नवले याचेकडून फ्लॅट विकत घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाणही

केली नाही व त्यामध्ये माझा दातही पडला नाही.

**( निशाणी २५ वरील आदेशानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब )**

समक्ष,

ANANT RADHAKISHAN TENGSE Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE Date: 2026.01.17 17:39:36 +0530

दिनांक ०३.०१.२०२६ **( अनंत रा. टेंगसे )**
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**<u>आज दिनांक १७.०१.२०२६ रोजी साक्षीदार नामे नामदेव पुनाजी लांडे, रा. गुरवझाप यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरू</u>**

३. प्रश्न – श्रेया रेसिडेन्सही ही जगदाळे नावाच्या इसमाची आहे?
उत्तर – सदर रेसिडेन्सीमध्ये चार फ्लॅट जगदाळे यांचे व चार फ्लॅट आरोपीचे आहेत.
श्रेया रेसिडेन्सीमध्ये आरोपीचे फ्लॅट असल्याबाबतचे कागदपत्र माझ्याकडे आहेत. त्याबातची नोटरी मी दाखल करण्यास तयार आहे. श्रेया रेसिडेन्सीमध्ये आरोपी हा पाणी सोडण्यासाठी नेमलेला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तोच पाणी चालू करत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा व श्रेया रेसिडेन्सीचा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी श्रेया रेसिडेन्सीमध्ये फ्लॅट हे रामकृष्ण शंकर जगदाळे यांच्याकडून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली

नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी जनार्दन नवले हा श्रेया रेसिडेन्सीमध्ये त्याच्या मित्राकडे आला होता व त्यावेळी आमच्या घरामध्ये भांडण चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जनार्दन नवले याने आम्हाला भांडण करू नका असे चांगले सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हास समजून सांगितल्याचा राग आला त्यामुळे त्याचेविरूध्द सदरची बनावट केस दाखल केली.

४. हे म्हणणे खरे नाही की, जनार्दन याने मला मारहाणही केली नाही व त्यात माझा दातही पडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरूध्द खोटी केस दाखल केली व आजरोजी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.17 17:39:42 +0530

दिनांक १७.०१.२०२६
अकोले

( अनंत रा. टेंगसे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.